रविवार

सातारा, रविवार, २४ जुलै २०१६ । किंमत ₹ ४

सकाळ

# युवतींच्या छेडछाडीचा प्रश्न कोरेगावात ऐरणीवर

## 'डीपी'मध्ये महिलांची समिती स्थापन होणार

**पळशी, ता. २३ :** कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयातील मुलींच्या छेडछाडीचा प्रश्न ऐरणीवर आला असून, या प्रश्नासंदर्भात चर्चा करण्यासाठी महाविद्यालयाने बोलावलेल्या प्रमुख नागरिकांच्या बैठकीत महिलांची समिती स्थापन करण्याचा निर्णय झाला. ही समिती सामाजिक दबाव निर्माण करण्याची भूमिका बजावेल, असे या वेळी ठरविण्यात आले. पान ८ वर »

**मुलींच्या होणाऱ्या छेडछाडीसंबंधी दै. 'सकाळ'ने 'टपोरेगिरी...' विषयी अंकात मांडलेल्या वस्तुस्थितीमुळे पुढील दिशा ठरविण्यासाठी मार्गदर्शन मिळाले.**

**- डॉ. विजयसिंह सावंत,**
प्राचार्य, डी. पी. भोसले महाविद्यालय, कोरेगाव

# युवतींच्या छेडछाडीचा प्रश्न कोरेगावात ऐरणीवर

**» पान १ वरून**

महाविद्यालयातील काही मुलींची गुरुवारी (ता. २१) छेडछाड झाल्याचे निदर्शनास आले होते. महाविद्यालयाबाहेरच्या काही मुलांनी हे कृत्य केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर संबंधित मुलींनी प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांच्याकडे तक्रार केली. त्यावर डॉ. सावंत यांनी कोरेगाव पोलिस ठाण्यात पत्र दिले; परंतु संबंधित मुलींच्या पालकांनी तक्रार देण्यास नकार दिल्यानंतर कारवाई कोणी व कोणावर करायची, असा प्रश्न उपस्थित झाला.

संवेदनशील विषय असल्याने त्यावर ठोस निर्णय करणे किंवा तोडगा काढणे आवश्यक असल्याने कोरेगावातील प्रमुख नागरिकांची आज बैठक बोलावली होती, अशी माहिती डॉ. सावंत यांनी दिली.

ते म्हणाले, ''बैठकीस कोरेगावातील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले. या सर्वांना मुलींच्या छेडछाडीच्या प्रश्नाविषयी कल्पना दिली. रस्त्यावर प्रकार घडल्यास महाविद्यालयाचा स्टाफ रस्त्यावर उतरू शकत नाही. त्यामुळे कारवाईवर मर्यादा येत आहेत. शिवाय राजकीय हस्तक्षेपही होतो. त्याचबरोबर मुलींचे पालक तक्रार देण्यास पुढे येत नाहीत. त्यामुळे हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा होतो, असे नागरिकांच्या निदर्शनास आणून दिले.

छेडछाडीच्या प्रकरणासंबंधी शक्यतो मुली या पुरुषांकडे बोलू शकत नाहीत. त्यामुळे महिलांची समिती स्थापन करण्याच्या मुद्द्यावर बैठकीत प्रामुख्याने चर्चा झाली. त्यानुसार सामाजिक, राजकीय क्षेत्रातील महिलांचा सहभाग असलेली समिती स्थापन करण्याचे ठरले. ही समिती सामाजिक दबाव निर्माण करण्याची भूमिका बजावेल. या समितीकडे मुली निर्भयपणे तक्रार करू शकतील आणि असे कृत्य करणाऱ्यांना चाप लावता येईल, असेही डॉ. सावंत यांनी स्पष्ट केले.